**मराठी भाषा विकास व संवर्धनाकरिता आखण्यात आलेल्या योजनांसाठी पुरवणी मागणीव्दारे अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग,
शासन निर्णय क्रमांक - पूरक-२०११/१४५/प्र.क्र.६६/२०११/भाषा-३,
मंत्रालय, मुंबई - ४०००३२.
**दिनांक - १७ जानेवारी, २०१२.**

**संदर्भ : १) मराठी भाषा विभाग, पत्र क्र.अर्थसं-२०११/प्र.क्र.८२/२०११/आस्था-३, दिनांक १६.०१.२०१२.**
**२) वित्त विभाग, परिपत्रक क्र. पूरक-२०१२/प्र.क्र.३/अर्थसंकल्प-३, दिनांक १०.०१.२०१२.**

**प्रस्तावना :-**

सन २०११-१२ या वर्षाचे खर्चाचे पूरक विवरणपत्र दिनांक १२ डिसेंबर, २०१२, रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले होते. सदर पुरवणी खर्चास हिवाळी अधिवेशनामध्ये विधानमंडळाने मान्यता दिली असून सदर पुरवणी विनियोजन विधेयक मा. राज्यपालांच्या संमतीनंतर महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २०११ (सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४ दिनांक २२ डिसेंबर, २०११ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामध्ये राज्य मराठी विकास संस्था, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांसाठी रु.१,८२,००,०००/- (रुपये एक कोटी ब्याऐंशी लक्ष फक्त) इतका अतिरिक्त निधी पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आला आहे. या संस्था / मंडळामार्फत सन २०११-१२ या वित्तीय वर्षात राबविण्यात येणाऱ्या योजनांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

**रु.(लक्ष)**

| अ.क्र. | विभागाचे नाव | उपक्रम | मंजूर करण्यात आलेला निधी |
|---|---|---|---|
| १ | **महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ** | १) विश्वकोश ध्वनी चित्रफित | १०.०० |
| | | २) विश्वकोश राज स्पर्धा | ३.०० |
| | | ३) बोलका कन्याकोश | ३.०० |
| | | ४) विश्वकोश प्रचार व प्रसार | ५.०० |
| | | ५) विश्वकोश प्रश्नमंजुषा | ३५.०० |
| | | **एकूण** | **५६.००** |
| २ | **महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ** | १) ग्रंथसंस्कृती जोपासना अभियान * | ३५.०० |
| | | २) ई बुक | ४.०० |
| | | ३) छोटया साहित्य संमेलनांकरीता अर्थसहाय्य | २०.०० |
| | | ४) महाराष्ट्राबाहेरील (बृहन्महाराष्ट्रातील) संस्थांना अर्थसहाय्य | २०.०० |
| | | **एकूण** | **७९.००** |
| ३ | **राज्य मराठी विकास संस्था** | १) पुरस्कारप्राप्त मराठी पुस्तकांच्या ऑडीयो सीडीज (३ पुस्तके) | १०.०० |
| | | २) युनिकोड टंक निर्माण करणे | ३५.०० |
| | | ३) मराठी संकेतस्थळ निर्मिती व स्पर्धा (शासकीय / निमशासकीय कार्यालये व खुला गट) | २.०० |
| | | **एकूण** | **४७.००** |
| | | **एकूण** | **१८२.००** |

सदर निधी प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांचेकडे उपरोक्त बाबींवर खर्च करण्यासाठी या शासन निर्णयान्वये मंजूर करुन सुपूर्द करण्यात येत आहे.

२. सदर पुरवणी विनियोजन अधिनियमानुसार मंजूर झालेल्या पूरक मागण्यांच्या अनुषंगाने माहे मार्च २०१२ पर्यंतचे मासिक निधी विवरणपत्र तयार करुन तसेच ते मान्य करुन अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर भरण्यात यावे व त्याची प्रत तात्काळ शासनास सादर करावी.

३. या बाबींवर होणारा खर्च "मागणी क्रमांक झेडएफ-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५ - कला व संस्कृती (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन -

(०२) (योजनांतर्गत योजना) -

(०२) (०१) राज्य मराठी विकास संस्था (२२०५ ३२०५) २१

(०२) (०२) राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ (२२०५ ३२१४)

(०२) (०३) मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे विकास कार्यक्रम (२२०५ ३२२३) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली सन २०११-१२ या वर्षात पुरवणी मागणीव्दारे उपलब्ध करण्यात आलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. यासाठी प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ यांना किंवा त्यांनी घोषित केलेल्या आहरण व संवितरण अधिकाऱ्यांस यासंबंधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या अनौचारिक संदर्भ क्र.२४०/१४३३, दिनांक १४.११.२०११, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८३८/११/व्यय-४, दिनांक २९.११.२०११ व वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक २ येथील दिनांक १० जानेवारी, २०१२ च्या परिपत्रकान्वये प्राप्त झालेल्या मंजुरीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६४५४३५९३३)

( किशोर रा. कुलकर्णी )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रती,

१. संचालक, राज्य मराठी विकास संस्था,
२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
३. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ मुंबई,
४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
७. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई,
८. प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था,
९. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांना विनंती करण्यात येते की,

*** ग्रंथसंस्कृती जोपासना अभियानासाठी** आकस्मिकता निधी अग्रिमातून मंजूर करण्यात आलेली रु.३५.०० लक्ष इतकी रक्कम यापुढे आकस्मिकता निधीच्या खर्च खाती न टाकता, एकत्रित निधीच्या खाती खर्ची टाकण्याची दक्षता घ्यावी.

१०. सचिव, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ
११. वित्त विभाग (व्यय - ४ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई,
१२. सहसंचालक, लेखा व कोषागारे संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई,
१३. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प / भाषा - २), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४. भाषा - ३ (संग्रहार्थ).